S.Y.M.A. (Part-II)(Marathi)(with Credits)-Regular-Semester 2012 Sem IV

# MAMR242-1 - Prachin Madhyayugin Marathi Kavita Paper - I

**(प्राचीन मध्ययुगीन मराठी कविता)**

P. Pages : 2 **GUG/W/16/5095**

Time : Three Hours Max. Marks : 80

* 2 7 0 6 *

---

**1.** पुढीलपैकी **कोणत्याही एकाच** गटातील काव्यखंडाचे ससंदर्भ स्पष्टीकरण करा. **20**

**गट 'अ'**

क) कोल्हाटीण मारिति ऐशी उडी
एकवीस स्वर्गावरती माडी
देखे द्वार खिडकी उघडी
अगाध माया ।।

ख) संसारी येते वेळे। जल्मलासी गोधनसाळे
इस्टानी तुज पोसिलाः ।।
अनाथु देखुनि। ग्रामोग्रामी हिंडुनी
थारा तुज नाही जाहला.

ग) ते शीतलोपचारी जागी जाली हळूच मग बोले।
'औषध नलगे मजला;' परिसुनि जननी
'बरे' म्हणुनि डोले।।

घ) नट धीट अचाट राही नटला सारंगपाणी
पतिव्रता चंद्रावळा भोगेली त्या भगवंतानी

**किंवा**

**गट 'आ'**

च) आधी देखत होतो सकळ
मग ही दृष्टी गेली आले पडळ
चालता मार्ग न दिसे केवळ
आता मज करा कृपा मी दीन तुम्ही दयाळ

छ) म्हणे ऐसे कस्ट
साहावेया दुर्घट
कां तूं आलासी बाळाः
स्वर्गसुखा सांडोनी
संसारूइ वर्जुनी
काय करिसी अंत्राळा

ज) माझा भीम जैसा पिता। तैसे तुम्ही जी तत्वता ।
करा कन्यादान आता । नलनाथाचे करी ।।

munotes.in

झ) हिण माझें प्रालब्ध वांझपण कधी फिटेल बाई ।
एक बाळक पोटी नाही ।।
सर्व गोष्टी अनुकूल कृपा परिपूर्ण ईश्वराची ।
नसें न्यूनता मला बाई कोण्या पदार्थाची ।
काया वाचा मनें भुकेली एक्या बाळकाची ।।

**2.** नाथांची भारूडे ही एकसारखी व एकजिनसी नाहीत. हे विधान स्पष्ट करा. **15**

**किंवा**

'एकनाथांची भारूडे म्हणजे आध्यात्मिक रूपके होत'. साधार स्पष्ट करा.

**3.** 'करूण रसाचा उत्कट विलास म्हणून 'क्रिस्ताचे यातनागीत' या काव्यखंडाचा परामर्श घ्या. **15**

**किंवा**

'क्रिस्ताचे यातनागीत' यातील शोकप्रसंगाचे सोदाहरण वर्णन करा.

**4.** काव्यकथा या दृष्टीने रघुनाथ पंडितांच्या 'दमयंती स्वयंवराख्याना'ची कलात्मक वैशिष्ट्ये सांगा. **15**

**किंवा**

'दमयंती स्वयंवराख्याना'च्या आधारे नलाचे स्वभावचित्र रेखाटा.

**5.** लावणी वाङ्मयाची वैशिष्ट्ये पैंजणच्या आधारे सोदाहरण सांगा. **15**

**किंवा**

शाहीर परशरामाच्या काव्याचा परामर्श पैंजणच्या आधारे घ्या?

**********

munotes.in